www.attalmat.com



वट सावित्री पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

# अट्टल मत

RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

वर्ष -१८, अंक-३८ | छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. ९ जून २०२५ | किंमत २ रूपये, पाने -४

## रविकांत राठोड, मुकेश राठोडसह सातारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षकांविरुद्ध कार्यवाही न झाल्यास माननीय मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानासमोर आत्मदहनाचा अमृता चव्हाण यांचा इशारा

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगरातील रविकांत राठोड यांच्याविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात दाखल असलेला गुन्हा मागे घेण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब करूनही काही उपयोग होत नसल्याने त्यांनी त्याचे मित्र मुकेश राठोड यांच्यासोबत संगणमत करून संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री संग्राम ताटे यांच्या मदतीने सदर पोलीस ठाण्यात मुकेश राठोड व इतर पुरुष व महिला आणि अमृता चव्हाण यांच्या नावाने FIR नोंद करून फसविण्याचा प्रकार केलेला आहे.

त्यामुळे रविकांत राठोड , मुकेश राठोड व सातारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री संग्राम ताठे यांच्याविरुद्ध कार्यवाहीं न झाल्यास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या मुंबई येथील वर्षा निवासस्थानासमोर दिनांक १२/६/२०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा तक्रारदार अमृता चव्हाण यांनी माननीय जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत दिल्याचे पत्र प्रसिद्धीस दिले आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, रविकांत राठोड हे सदर तक्रारदार महिलेला स्वतःच्या बंजारा ब्रिगेड या संघटनेत पद देण्याचे आमिष दाखवून नऊ लाख रुपये घेतलेले आहे.

रविकांत राठोड यांनी घेतलेले पैसे परत करण्याऐवजी तिला दुसरे लग्न स्वतः सोबत करण्यासाठी त्रास देऊ लागला त्याच्या त्रासाला कंटाळून अमृता चव्हाण यांनी सातारा पोलीस ठाण्यात दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी तक्रार दिल्यावरून रविकांत राठोड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची बातमी दैनिकात प्रकाशित झाल्याने षडयंत्रकारी रविकांत राठोड यांनी त्याच्या संघटनेतून बाहेर पडलेले दुसऱ्या संघटनेत काम करणाऱ्या मुकेश राठोड यांच्यासोबत हात मिळवणी करून सातारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री संग्राम ताठे यांच्या मदतीने मुकेश राठोड सदर तक्रारदार महिला अमृता चव्हाण इतरांविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करायला लावून दैनिकात बातम्या प्रकाशित करून बदनामी केलेली आहे.

सातारा पोलीस ठाण्यात रविकांत राठोड यांच्याविरुद्ध दाखल असलेला गुन्हा परत घ्यायला लावण्यासाठी गुंड ज्ञानेश्वर चव्हाण उर्फ चिकू,अमोल चव्हाण, प्रतिभा अनिल गायकवाड, आदिना अमृता चव्हाण यांच्या घरी पाठवून यापूर्वी व सध्याही दबाव आणत आहे.

अमृता चव्हाण यांच्याकडे असलेली 20, D.V. 5174 ही गाडी रविकांत राठोड व त्याच्या सहकाऱ्यांनी पळून नेलेली आहे याबाबतची अमृता चव्हाण यांनी दिनांक १७ /५ /२०२५ रोजी पुंडलिक नगर पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली आहे. असेही सदरील तक्रार अर्जात नमूद आहे. सदर प्रकरणी कार्यवाहीं होण्याऐवजी त्याला पाठीशी घालण्याचा प्रकार सुरू आहे. रविकांत राठोड व मुकेश राठोड हे एका महिलेचे अपहरण व विनयभंग २०२३ चा प्रकरणातील आरोपी आहेत. रविकांत राठोड व मुकेश राठोड आणि सातारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री संग्राम ताठे यांच्याविरुद्ध कार्यवाही न झाल्यास राज्याचे मुख्यमंत्री यांच्या वर्षा निवासस्थानासमोर दिनांक १२ जून २०२५ रोजी आत्मदहन करणार आहे असे अर्ज अमृता चव्हाण यांनी माननीय जिल्हाधिकारी यांच्यामार्फत माननीय मुख्यमंत्री व संबंधितांना दिले असल्याचे पत्र प्रसिद्धीसाठी दिले आहे.

## मंत्री शिरसाटांनी नियम डावलून शेंद्रा एमआयडीसीमध्ये ६ कोटींची जागा घेतली




छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

राज्याचे मंत्री आणि शहराचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या अडचणीत पुन्हा एकदा वाढ झाली आहे. एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शिरसाटांवर शेंद्रा एम आयडीसीमधील ६ कोटी रुपये किमतीची जागा नियम डावलून मिळवल्याचा गंभीर आरोप केला आहे. यात मुलगा सिद्धांत शिरसाट, पत्नी, व एका बिल्डरचे नाव असल्याचेही सांगितले.

जलील यांनी पत्रकार परिषद घेत शिरसाट यांच्यावर ताशेरे ओढले. शिरसाट यांनी त्यांच्या कागदपत्रांमध्ये म्हटले आहे की, त्यांनी सुरू करायच्या कंपनीसाठी दारू तयार करण्यास लागणारे काही केमिकल्स लागणार आहेत. पण कंपनी रजिस्ट्रेशनच्या कागदपत्रांमध्ये मात्र वेगळेच फूड प्रॉडक्ट्स दाखवले आहेत, असा दावा त्यांनी केला. शिरसाट यांनी जी कागदपत्रे सादर केली आहे त्यामध्ये काही तरी गोंधळ आहे. स्पिरिट किंवा अल्कोहोल फूड प्रॉडक्टमध्ये कुठे आणि कसे वापरले जाते, हे समजत नाही. हे दस्तऐवजांतील माहितीमध्ये गोंधळ स्पष्टपणे दिसतो, असेही जलील म्हणाले.

या प्रकल्पासाठी वित्त पुरवठा कसा होणार? यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विटस घेताना सांगितले गेले की, आम्ही पाच भागीदार असून प्रत्येकाने ३.५ कोटी रुपये दिले आणि उर्वरित रक्कम बँकेकडून लोन घेणार होतो.

मात्र, आता सादर करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालात हा एकूण खर्च १०५ कोटी ८९ लाख रुपये दाखवण्यात आला आहे. यामध्ये २६ कोटी ४७ लाख रुपये स्वतः गुंतवणार असल्याचे आणि ७९ कोटी ४२ लाखांचे कर्ज बँकेकडून उचलणार असल्याचे नमूद आहे, असे जलील यांनी स्पष्ट केले.

या आरोपांवर मंत्री शिरसाट यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, या प्रकरणामुळे त्यांच्यावरचा राजकीय आणि सामाजिक दबाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## रिक्षाचालकाच्या चाकू हल्ल्यातील युवकाचा मृत्यू छावणीतील घटना : आरोपीवर खुनाचा गुन्हा




छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

शिक्षक पात्रता परीक्षेसाठी शहरात आलेल्या जयराम बबन पिंपळे (२८, रा. वडाळा महादेव पिंपळे वस्ती, श्रीराम पूर, जि. अहिल्यानगर) या तरुणावर रिक्षाचालकाने चाकूने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना बुधवारी (दि.४) पहाटे छावणीतील इन्कम टॅक्स ऑफीससमोर घडली होती. या युवकाचा खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान शनिवारी (दि.७) मृत्यू झाला. खून प्रकरणात छावणी पोलिसांनी अथक परिश्रम घेऊन आरोपी रिक्षाचालकास अटक केली. मुजम्मील रफीक कुरेशी (२२, रा. राहुलनगर, रेल्वे स्टेशन) असे आरोपी रिक्षाचालकाचे नाव आहे.

छावणी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक डॉ. विवेक जाधव यांनी सांगितले की, जयराम बबन पिंपळे हे ३ जून रोजी रात्री शहरातील हॉटेलमध्ये थांबले होते. दुसऱ्या दिवशी ४ जून रोजी शिक्षक पात्रता परीक्षा असल्यामुळे ते पहाटे सुमारे ३.३० वाजता पायी बाबा पेट्रोल पंपाकडे गेले. तेथून वाळूज-पंढरपूरला जाण्यासाठी एका ऑटो रिक्षात बसले. लवकर पोहोचायचे असल्याने त्यांनी एकच प्रवासी घ्या, असे सांगितले. नंतर काही वेळाने अजून प्रवासी घ्यायचे असतील तर घ्या, असे सांगितले. यावरून रिक्षाचालक भडकला. जयराम आजारी असल्याने त्यांनी मास्क लावला होता. मास्क काढ, अशी धमकी रिक्षाचालकाने दिली.

जयराम शहरात नवीन असल्याने रस्त्याचा अंदाज नव्हता. याचा फायदा घेत रिक्षाचालकाने त्यांना इन्कम टॅक्स ऑफिससमोर अंधारात नेले. जयरामकडून पैसे हिसकावण्याचा प्रयत्न केला. यातून दोघांमध्ये झटापट झाली. जयरामने रिक्षाची चावी काढून घेतली. त्यामुळे चिडलेल्या रिक्षाचालकाने त्यांच्या छाती आणि पोटाच्या डाव्या बाजूस चाकूने वार केले. या अनपेक्षित हल्ल्यामुळे जयराम गांगरून गेला. जखमी झाल्यावर जयरामने तेथून पळ काढला. तसेच जे जे प्लस रूग्णालयात दाखल झाला.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व्यायामशाळेचे लोकार्पण; रुग्णांची देखभाल करतांना स्वतःचे आरोग्य उत्तम ठेवा- पालकमंत्री



छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी, डॉक्टर्स हे अहोरात्र रुग्णांना वैद्यकीय सेवा देतात. हे पवित्र कार्य करतांना डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी स्वतः च्या आरोग्याची देखभाल करणे आवश्यक आहे. त्यासाठी व्यायामशाळा त्यांना उपयुक्त ठरेल, त्याचा त्यांनी लाभ घ्यावा, अशा शब्दात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांशी संवाद साधला.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. अरविंद गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक येरेकर तसेच नंदकुमार घोडेले, जिम खाना समन्वक मिर्जा सिराज बेग, विद्यार्थी समन्वक आकांक्षा सिंग, हर्षदा शिरसाठ तसेच महाविद्यालयाचे विद्यार्थी, डॉक्टर, कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, येथे योगा आणि जिम सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या रुग्णालयात आलेला रुग्ण चांगले उपचार घेऊन दुरुस्त होऊन घरी जावा.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या या व्यायामशाळेत २२ व्यायामाची साधने लावलेले आहेत. वॉकिंग ट्रॅक, इनडोअर गेम साठी हॉल असून योगासने आदींसाठीही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे., अशी माहिती अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी यावेळी दिली.

संपादकीय

## आधुनिक सावित्रीची अवहेलना, जबाबदार कोण ?

एकीकडे आज महिला सर्व क्षेत्रांमध्ये सर्वोत्तम उंची गाठत, आपले कुटुंब, छंद अणि व्यवसाय यांची सांगड घालत आयुष्याला नवीन दिशा देत आहेत. मुलगा आणि मुलगी हा लिंगभेद आता जवळपास नष्ट झालेला आहे. बऱ्याच ठिकाणी मुलींना आपल्या घरातील लक्ष्मीचे स्थान देत आनंदाने मुलीचा जन्म साजरा केला जातो. असे कोणतेच काम किंवा क्षेत्र नाही जिथे महिला नाहीत.

पण तरी देखील आज समाजात महिलांना बघण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला की नाही यावर शंका उपस्थित झाली आहे. वैष्णवी हगवणेची संपूर्ण घटना अभ्यासली तर खरंच खूप विविध अंगी प्रश्न पडतात की अजूनही मुली, कुटुंब, आपला समाज बुरसटलेल्या विचारांनी ग्रस्त आहे. आज वैष्णवीची घटना मीडियामुळे जगासमोर आली; परंतु गावोगावी, खेड्यापाड्यात अनेक उच्चभ्रू घरांमध्ये अशा कितीतरी वैष्णवी असतील ज्या जगासमोर येत नसतील. जर आजच्या एकविसाव्या शतकातील आधुनिक, सुशिक्षित अणि स्वतंत्र विचारांच्या मुलींचा आपल्या पसंतीचा मुलगा शोधून, आई-वडिलांच्या संमतीने लग्न करून देखील हुंडाबळीसारख्या प्रथेला सामोरे जाऊन त्यांचा जीव जात असेल तर खरोखरच विचार करावा लागेल की खरंच महिलांच्या बाबतीत समाज आणि कुटुंबाची विचारसरणी बदलली आहे का?

आज मुलगी स्वतः शिकली आहे, कमावती आहे, स्वतःच्या पायावर उभी आहे. तिची स्वतःची स्वप्नं देखील ती पूर्ण करत आहे. असे असताना केवळ भौतिक वस्तूंसाठी आणि पैशासाठी तिचा एवढा अमानुषपणे सासरच्या मंडळींनी छळ करावा इतकी हतबल आजची मुलगी असू शकते यावर विश्वास बसत नाही; परंतु वैष्णवीची घटना आपल्याला आज देखील मुलींवर होणाऱ्या घरगुती हिंसेचा बळी जातोय हे सत्य स्वीकारायला भाग पाडते.

ज्या सासरच्या लोकांनी ज्यात तिची नणंद आणि सासू दोघी महिला आहेत अणि तरी त्यांनी तिच्यावर छळ केला, तिच्यावर इतक्या जखमा करून तिचा जीव घेतला त्यांना की तिच्या आई-वडिलांना ज्यांना मुलीची सगळी स्थिती माहीत असून देखील त्यांनी आपल्या मुलीला खंबीरपणे साथ न देता 'जा मुली दिल्या घरी सुखी राहा' म्हणत तिच्या लालची सासरच्या मंडळींचे लाड पुरवत होते, मुलीचा संसार तुटू नये म्हणून चुकीच्या गोष्टींना दुजोरा देत होते त्यांना. मुलीच्या जीवापेक्षा संसार महत्त्वाचा असतो का हा प्रश्न येथे निर्माण होतो. केवळ आपल्या मुलीचा संसार वाचावा अणि समाजात अब्रू जाऊ नये म्हणून मुलीला हाल अणि त्रास भोगत तिथेच राहा म्हणणारे पालक अजून देखील आहेत.

याचा अर्थ मग समाजाला आपण दोषी ठरवायचे का कारण तिच्या आई-वडिलांनी समाजाचा विचार केला की वैष्णवीने जर नवऱ्याचे घर अणि सासरची मंडळी सोडली आणि ती आई-वडिलांकडे राहू लागली, तर समाज काय म्हणेल या भीतीपोटी तिला तिथून बाहेर पडायला साथ देत नव्हते. आपला समाज हा इतका मागासलेल्या विचारांचा आहे की एखाद्या मुलीला त्रास होत असेल तरीही तिने नवऱ्याच्या घरी राहावे आणि मुलीच्या आई-वडिलांनी देखील आपली मुलगी सासरचे घर सोडून आली तर समाज काय म्हणेल या भीतीने ते त्यांच्या मागण्या पुरवत मुलीला त्या नरकामध्ये यातना सोसायला सोडत ठेवावे.

म्हणजे आपला समाज आज २१ व्या शतकात देखील हाच विचार करतोय की मुलीने मानसिक आणि शारीरिक त्रास होत असेल तरी सासरी राहावे अणि त्रास सहन करावा आणि मुलगी एकदा लग्न करून गेली की तेच तिचे घर असते. मग मुलींना स्वातंत्र्य देऊन, मुलींनी सुशिक्षित होऊन, स्वतःच्या पायावर उभे राहून नक्की बदल काय झाला? खरोखर वैष्णवीच्या घटनेने आपली विचार करण्याची पद्धती समाजाने बदलण्याची गरज आहे हे दाखवून दिले आहे.

आज त्याच घरातली आणखी एक सून जिला आई- वडील अणि भावाने समजून घेतलं, तिला सपोर्ट केला, तिच्या पाठीशी खंबीर उभे राहिले आणि पोलिसांमध्ये तक्रार केली. आज वैष्णवीची मोठी जाऊ या छळाला बळी न पडता स्वतःसाठी लढली आणि समाजाचा विचार न करता कुटुंबाने साथ दिल्यामुळे ती यातून वाचली आणि आपल्यात जिवंत आहे.

स्वतःचं पोट भरत आपले जीवन सुधारू शकते इतपत ती गंभीरपणे जगाला आणि समाजाला सामोरे जाऊ शकते हे तिने सिद्ध केले; परंतु त्याच घरातली दुसरी सून वैष्णवी जी स्वतः तिथून सुटका करण्यात असमर्थ ठरली आणि जिच्या आई-वडिलांनी तिला समजून न घेता तिच्या सासरच्या मंडळींचे लाड पुरवले. तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास न देता त्यांच्या मागण्या केवळ मुलीचा संसार तुटू नये म्हणून पूर्ण करत राहिले आणि शेवटी मुलीचा जीव गेला.

या एकाच घरातल्या दोन घटना दोन कुटुंबांच्या आणि आपल्या समाजाच्या दोन पैलू दर्शवत आहेत. पण मला असं वाटतं या सगळ्या घटनेला जास्त जबाबदार कोण असेल तर ती म्हणजे मुलगी स्वतः कारण की जर आपण शिक्षण घेतो, स्वतःच्या पायावर उभे राहतो तर आपल्यावर अन्याय होत आहे ही गोष्ट समजताच वैष्णवीने स्वतःसाठी खंबीरपणे उभं राहायला हवं होतं. आई-वडिलांकडे पैसे न मागता सासरच्या मंडळींना नकार देऊन आई-वडिलांना जसे लग्न करून द्या म्हणून समजूत घालून तयार केले त्याचप्रमाणे माझा निर्णय चुकला म्हणून माफी मागत आई-वडिलांची मदत घेत नवरा आणि सासरच्या मंडळींना मोठ्या जावेप्रमाणे धडा शिकवायला हवा होता.

# अन्न सुरक्षित तर आरोग्य सुदृढ!

**अन्न** साखळीच्या प्रत्येक टप्प्यावर अन्न सुरक्षित राहते याची खातरजमा करण्यात अन्न सुरक्षेची महत्त्वाची भूमिका आहे. उत्पादन ते कापणी, प्रक्रिया, साठवणूक, वितरण, तयारी आणि वापरापर्यंत सुरक्षा आवश्यक असते. दररोज सरासरी १६ लक्ष लोक असुरक्षित अन्न सेवन करतात. अन्न जिवाणू, विषाणू, परजीवी किंवा रासायनिक पदार्थांनी दूषित झाल्यामुळे ते आजारी पडतात. त्याचा परिणाम सर्व देशांवर होतो. जगभरातील दहापैकी एक व्यक्ती दरवर्षी दूषित अन्नामुळे आजारी पडतो. अन्नजन्य रोगांमुळे सार्वजनिक आरोग्यावरील भाराची तीव्रता म लेरिया किंवा एचआयव्ही एड्सच्या तुलनेत आहे. जिवाणू, विषाणू, परजीवी किंवा जड धातूंसारख्या रासायनिक पदार्थांनी दूषित अन्न खाल्ल्याने दोनशेहून अधिक रोग होतात. अन्नजन्य रोगाचे ४० टक्के ओझे ५ वर्षाखालील मुलांकडून वाहून जातो. प्रतिजैविक प्रतिरोधक सूक्ष्मजंतू अन्नसाखळीद्वारे, प्राणी आणि मानव यांच्यातील थेट संपर्काद्वारे किंवा वातावरणाद्वारे प्रसारित केले जाऊ शकतात.

NATIONAL HEALTH MISSION
राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन
Dept. H & FW
Govt. of Karnataka

प्रतिवर्षी प्रतिजैविक प्रतिरोधक संसर्गामुळे जगभरात अंदाजे ७ लाख लोक मरतात. ५ वर्षांखालील मुलांना अन्नजन्य रोगाचा ४० टक्के भार सहन करावा लागतो, दरवर्षी एक लाख पंचवीस हजार मृत्यू होतात. अन्नजन्य परजीवी रोगांमुळे तीव्र आणि जुनाट आरोग्य समस्या उद्भवू शकतात. ११ मुख्य परजीवी रोगांपासून होणाऱ्या आजारांची अंदाजे संख्या दरवर्षी ४८.४ दशलक्ष आहे, त्यापैकी ४८ टक्के अन्नाद्वारे पसरतात. पाच वर्षांखालील मुलांना असुरक्षित अन्नामुळे कुपोषण आणि मृत्यू होण्याचा धोका जास्त असतो आणि अन्नजन्य आजाराचा ४० टक्के भार त्यांच्यावर असतो. या वयोगटातील अतिसारामुळे सहापैकी एकाचा मृत्यू असुरक्षित अन्नामुळे होतो. सुरक्षित आणि पौष्टिक आहारामुळे मुलांच्या वाढीस आणि विकासासाठी बौद्धिक आणि शारीरिक क्षमता सुधारून, तसेच प्रौढ जीवनात शालेय कामगिरी आणि कार्य उत्पादकता वाढून फायदा होतो. कोणतेही विरोधाभास नसल्यास, जीवनाच्या पहिल्या सहा महिन्यांत बाळाला खायला देण्याचा सर्वात सुरक्षित मार्ग म्हणजे अनन्य स्तनपान होय.

सुरक्षित अन्नाच्या उत्पादनामुळे अन्नाची हानी आणि कचरा कमी होतो आणि ग्रहाला फायदा होतो. उत्पादकता वाढवून, समृद्ध राष्ट्रीय खाद्य बाजार आणि स्थिर अन्न निर्यात आणि व्यापाराला अनुमती देऊन सुरक्षित अन्नाचा अर्थव्यवस्थेला फायदा होतो. हे आरोग्य सेवा प्रणालीवरील ताण कमी करते. अन्नाच्या सुरक्षिततेवर प्राणी, वनस्पती आणि ज्या वातावरणात ते तयार केले जाते. त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

अन्न सुरक्षेसाठी सर्वांगीण वन हेल्थ दृष्टीकोन अंगीकारल्याने एक उत्तम अन्न सुरक्षा व्यवस्था मिळेल. १८८ देश आणि एक सदस्य संस्था- युरोपियन युनियनने अन्न सुरक्षितता आणि गुणवत्तेशी संबंधित सर्व क्षेत्रांमध्ये विज्ञान-आधारित शिफारशींवर वाटाघाटी केल्या आहेत, कोडेक्स एलिमेंटेरियस मानके, जे अन्न सुरक्षित आहे आणि व्यापार करता येईल याची खात्री करतात. अन्न सुरक्षा हे एसडीजीएस साध्य करण्यात योगदान देते आणि हे खरोखरच क्रॉस-कटिंग क्षेत्र आहे. ७ जून २०२४ रोजी जागतिक अन्न सुरक्षा दिन अन्न सुरक्षा घटनांकडे लक्ष वेधून घेईल. या वर्षीची थीम अन्न सुरक्षेच्या घटनांसाठी तयार राहण्याचे महत्त्व अधोरेखित करते, मग त्या कितीही सौम्य किंवा गंभीर असू शकतात. अन्न सुरक्षा घटना ही अशी परिस्थिती आहे जिथे अन्न सेवनाशी संबंधित संभाव्य किंवा पुष्टी केलेले आरोग्य धोके आहेत. अन्नाची घटना घडू शकते, उदाहरणार्थ- अपघात, अपुरी नियंत्रणे, अन्न फसवणूक किंवा नैसर्गिक घटनांमुळे घडू शकते. अन्न सुरक्षा घटनांचे व्यवस्थापन करण्यास तयार असण्यासाठी धोरणकर्ते, अन्न सुरक्षा अधिकारी, शेतकरी आणि अन्न व्यवसाय ऑपरेटर यांच्याकडून समर्पित प्रयत्नांची आवश्यकता असताना, ग्राहक देखील सक्रिय भूमिका बजावू शकतात. तर अन्न सुरक्षा घटनांना तोंड देण्यासाठी तयार होण्यासाठी काय केले जाऊ शकते. सरकारे करू शकतात- राष्ट्रीय अन्न सुरक्षा आपत्कालीन प्रतिसाद योजना विकसित किंवा अद्यतनित करण्यासाठी वचनबद्ध. राष्ट्रीय अन्न नियंत्रण प्रणाली मजबूत करणे, पाळत ठेवणे आणि समन्वय क्षमता वाढवणे. अन्न व्यवसाय आणि सामान्य लोकांशी संवाद सुधारा, अन्न व्यवसाय करू शकतात. अन्न सुरक्षा व्यवस्थापन योजना सुधारा, 'शिकलेले धडे' सामायिक करा आणि एकमेकांसोबत सहकार्याने कार्य करा. ग्राहकांशी संवाद साधण्याचा मार्ग सुधारा, ग्राहक करू शकतात. अन्न सुरक्षा घटनेचा अहवाल कसा द्यावा किंवा प्रतिसाद कसा द्यावा हे त्यांना माहित असल्याची खात्री करा त्यांना घरातील अनपेक्षित गोष्टींचे परिणाम आणि प्रतिक्रिया कशी द्यायची हे समजत असल्याची खात्री करा, अन्न सुरक्षा हा प्रत्येकाचा व्यवसाय आहे.

अन्न पुरवठा साखळी अनेक लोकांचा समावेश आहे- उत्पादक, प्रोसेसर, वाहतूकदार, वितरक, किरकोळ विक्रेते, स्वयंपाकी तसेच ग्राहक. साखळीतील प्रत्येक बिंदूवर, असे धोके आहेत ज्यामुळे दूषित होऊ शकते. विविध टप्प्यांवर सहभागी असलेल्या प्रत्येकाची अन्न सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी आहे. जागतिक अन्न सुरक्षा दिनानिमित्त पाच आवाहने आहेत- ते सुरक्षित असल्याची खात्री करा - सरकारने सर्वांसाठी सुरक्षित आणि पौष्टिक अन्न सुनिश्चित केले पाहिजे सुरक्षित वाढवा - कृषी आणि अन्न उत्पादकांनी चांगल्या पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. ते सुरक्षित ठेवा - व्यवसाय चालकांनी अन्न सुरक्षित असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. सुरक्षित काय आहे ते जाणून घ्या - ग्राहकांना सुरक्षित आणि आरोग्यदायी अन्नाबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे. अन्न सुरक्षेसाठी संघ करा - सुरक्षित अन्न आणि चांगल्या आरोग्यासाठी एकत्र काम करूया! आपण खातो तेव्हा आमचे अन्न सुरक्षित आहे हे आम्हाला कसे कळते? आम्ही कदाचित आमचे हात धुतले असतील, आमची स्वयंपाकघरातील भांडी स्वच्छ केली असतील आणि आमचे अन्न योग्य तापमानात शिजवले असेल, सर्व चांगल्या अन्न सुरक्षा पद्धती. उत्पादनात कोणते घटक आहेत किंवा ते कसे शिजवायचे हे पाहण्यासाठी आम्ही कदाचित फूड पॅकेजिंग लेबले वाचली असतील आणि कदाचित हे लक्षात न घेता, आम्ही आम च्या अन्नाची योग्य प्रकारे वाढ, प्रक्रिया, पॅकेजिंग, वितरण आणि तयार करण्यात गुंतलेल्या प्रत्येकावर विश्वास ठेवला आहे, जेणेकरून आम्ही आजारी न पडता त्याचा आनंद घेऊ शकतो.



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

आमचे अन्न सुरक्षित होते आणि आमचा विश्वास सार्थ ठरला कारण आमचे अन्न बनवण्यात गुंतलेले लोक - मग ते आमच्या घराजवळ असोत किंवा जगाच्या दुसऱ्या बाजूला. त्यांनी स्थापित अन्न सुरक्षा पद्धतींचे पालन केले, जे म ानकांच्या स्वरूपात पारदर्शकपणे उपलब्ध आहेत. दुसऱ्या शब्दांत, अन्न मानके आपल्या सर्वांसाठी विश्वासाचा आधार बनतात. अन्न मानके ही सुरक्षा आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्याचा एक मार्ग आहे. ते शेतकरी आणि प्रोसेसरसाठी स्वच्छ अन्न हाताळण्याबाबत मार्गदर्शन करतात. ते अॅडिटीव्ह, दूषित पदार्थ, कीटकनाशकांचे अवशेष आणि पशुवैद्यकीय औषधांची कमाल पातळी परिभाषित करतात, जे सर्वजण सुरक्षितपणे सेवन करू शकतात. शिवाय अन्न सुरक्षित ठेवण्यासाठी त्याचे मोजमाप, पॅकेज आणि वाहतूक कशी करावी हे म ानके निर्दिष्ट करतात. पोषण आणि ॲलर्जीन लेबलिंग सारख्या गोष्टींवर मानक लागू केल्याबद्दल धन्यवाद, ग्राहकांना हे समजू शकते की त्यांच्यासाठी अन्न चांगले आहे की नाही. बहुतेक सरकारे आणि संस्था जैविक, रासायनिक आणि भौतिक स्वरूपाचे धोके कव्हर करणारे वैज्ञानिक जोखीम मूल्यांकनांवर आधारित अन्न मानकांचा अवलंब करतात आणि त्यांची अंमलबजावणी करतात. मानके वैयक्तिक सरकारे किंवा संस्थांद्वारे किंवा प्रादेशिक किंवा आंतर-सरकारी मानक-सेटिंग संस्थांद्वारे विकसित केली जाऊ शकतात. अशीच एक आंतरराष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता मानक-निर्धारण संस्था म्हणजे कोडेक्स एलिमेंटेरियस कमिशन किंवा थोडक्यात कोडेक्स. कोडेक्स हे ठिकाण आहे, जिथे १८८ सदस्य देश आणि १ सदस्य संघटना-युरोपियन युनियन यांचे प्रतिनिधी अन्न सुरक्षित असल्याची खात्री करण्यासाठी एकत्र काम करतात.

कोडेक्स ग्राहकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि अन्न व्यापारातील न्याय्य पद्धती सुनिश्चित करण्याच्या आदेशासह कार्य करते. तांत्रिक समित्या पारदर्शक आणि सर्वसमावेशक पद्धतीने मानके, मार्गदर्शक तत्त्वे आणि सराव संहिता यांच्यासाठी मजकूर विकसित करण्यासाठी कार्य करतात. एफएओ आणि डब्ल्यूएचओच्या नेतृत्वाखालील जागतिक तज्ञ गटांच्या वैज्ञानिक सल्ल्यानुसार, मजकूर उद्योग आणि ग्राहक संघटनांसह २४३ निरीक्षक संस्थांच्या इनपुटसह विकसित केले आहेत.

सरकार आणि अन्न उद्योगाद्वारे वापरलेले, कोडेक्स मानके राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याचे म ार्गदर्शन करतात आणि सर्वोत्तम पद्धती सुनिश्चित करतात. जागतिक व्यापार संघटना बेंचमार्क म्हणून कोडेक्स मानके देखील वापरते. जर तुमचे अन्न परदेशातून येत असेल तर ते या मानकांची पूर्तता करणे आवश्यक आहे. कोडेक्स मानके अन्न सुरक्षेच्या केंद्रस्थानी असतात. त्यांना सहा दशके झाली आहेत. प्रत्येक वर्षी फूड कोड वाढतो- नवीन मानके सादर केली जातात आणि नवीन डेटा उपलब्ध झाल्यावर विद्यमान मानके अद्यतनित केली जातात. सन २०२३मध्ये कोडेक्स ६० वर्षांचे झाल्यावर, आम्ही सर्वत्र सर्वांसाठी सुरक्षित अन्नाचा मार्ग परिभाषित करण्यासाठी अन्न मानके साजरी करतो.

अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास उद्दिष्टे- अनेक शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अन्न सुरक्षा ही गुरुकिल्ली आहे आणि जागतिक अन्न सुरक्षा दिवस अन्नजन्य जोखीम टाळण्यासाठी, शोधण्यात आणि व्यवस्थापित करण्यात मदत करण्यासाठी ते चर्चेत आणते. सुरक्षित अन्न आर्थिक समृद्धी, शेतीला चालना, बाजारपेठ, पर्यटन आणि शाश्वत विकासासाठी योगदान देते. अन्न सुरक्षेशिवाय अन्न सुरक्षा नाही. उपासमार संपवणे म्हणजे सर्व लोकांना वर्षभर सुरक्षित, पौष्टिक आणि पुरेसे अन्न मिळणे. अन्न सुरक्षेचा लोकांच्या आरोग्यावर आणि पोषण आहारावर थेट परिणाम होतो. अन्नजन्य रोग टाळता येतात. जेव्हा देश अन्न साखळीत सुरक्षित आणि अपेक्षित गुणवत्तेचे असल्याची खात्री करण्यासाठी त्यांची नियामक, वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षमता मजबूत करतात, तेव्हा ते अन्न उत्पादन आणि उपभोगाच्या अधिक शाश्वत नमुन्यांकडे जातात. सध्या १.६ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त वार्षिक अन्न निर्यात असलेले जागतिकीकृत जग आणि जटिल अन्न प्रणाली अन्न सुरक्षित असल्याची खात्री करण्यासाठी सर्व क्षेत्रांम ध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्याची मागणी करते. अन्न सुरक्षा ही सरकार, अन्न उद्योग, उत्पादक आणि ग्राहक यांच्यात सामायिक जबाबदारी आहे.

!! सप्ताहभर आंतरराष्ट्रीय अन्न सुरक्षा दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# गुणवंतांच्या सत्कार समारंभाचे आयोजन; नोंदणी करण्याचे शिवराणा सेवा संघातर्फे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

सालाबादप्रमाणे शिवराणा सेवा संघ महाराष्ट्र या संघटनेच्या वतिने राजपूत/परदेशी भामटा समाजातील खालील क्षेत्रातील गुणवंत यशवंतांचा भव्य दिव्य महाराणा प्रतापसिंह गुणवंत पुरस्कार २०२५ सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. खालील क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी मुलं आणि मुलींनी आपली माहिती,

मार्क सिट, मो. नंबर पत्ता, शाळा खालील मोबाईल नंबर वर घेण्यात यावी एल.डी .ताटु अध्यक्ष शिवराणा सेवा संघ मो.८३०८१३६६८९. सौ.अंजली सुभाष कोकुल्डे. शहर अध्यक्ष शिवराणा सेवा संघ ९०११९७७७६८ किवा मुख्य कार्यालय शिवराणा वाचनालय पुंडलिकनगर छ.संभाजीनगर २०जून, २०२५ पर्यंत आपले नाव नोंदवावी असे आवाहन शिवराणा सेवा संघ वतीने करण्यात येत आहे.अ-१० वी व १२ वी परिक्षेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण घेवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे तसेच एम.पि.एस.सी, यु.पी.एस.सी, उ.अ. तसेच सरकारी किंवा इतर क्षेत्रात निवड झालेले, स्पर्धापरिक्षांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले आहे, असे गुणवंत विद्यार्थी.

विविध स्पर्धा परिक्षेतील यशवंत. एम.बि.बि.एस, व इंजिनिअरिंग साठी पात्र असलेले किंवा पुर्ण झालेले गुणवंत, तसेच सामाजिक, वैद्यकीय, कृषी,, इ. क्षेत्रात ज्या समाजबांधवांनी प्रशंसनीय/ उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे, करत आहे अशा समाज बांधव यांना महाराणा प्रतापसिंह समाज भूषण सन्मान पुरस्कार देण्यात येईल. मागील २० वर्षापासून दरवर्षी राजपूत परदेशी समाजातील कार्यरत असलेल्या बांधव यांना हा बहुमान दिला जाणार आहे पत्राद्वारे एल.डी. ताटू, ॲड सुभाष कोकुल्डे आनंद बारवाल अंजली कोकुल्डे, दुर्गासिंग महेर,कल्पेश ताटू नारायण उटाडे,भाऊसिंग बैनाडे काळुराम सिंगल ,शाम राजपूत, नरेंद्र गिरासे,शाम सिंगल , नारायण महेर कैलास जोनवाल, नारायण मरमट, कैलास करघे आदी




आकाश नरवडे, शहर जिल्हा उपाध्यक्ष
भारतीय जनता युवा मोर्चा छत्रपती संभाजीनगर

# १०० दिवस कार्यालयीन सुधारणा अभियानात पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग द्वितीय!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शासनाच्या यंत्रणेला अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि जनतेसाठी परिणामकारक बनवण्याच्या उद्देशाने ना.श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांच्या मार्गदर्शनाखाली '१०० दिवस कार्यालयीन सुधारणा अभियान' संपूर्ण राज्यात राबवण्यात आले.

या अभियानात पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यभरातून द्वितीय क्रमांक पटकावला असून, राज्यस्तरीय द्वितीय पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले आहे. ही आमच्या विभागासाठी अत्यंत सन्मानाची आणि प्रेरणादायी बाब आहे.वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सुविधा, तंत्रज्ञानाचा वापर, स्वच्छता, गुंतवणुकीस चालना, तक्रार निवारण, नागरिकहिताची कार्यपद्धती.. या सर्व १० निकषांवर पुणे विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी अपार मेहनत घेतली.


महाराष्ट्र शासन

Transformative 100 DAYS

PWD

प्रशस्तीपत्र

राज्यामध्ये विभागीय स्तरावरील शासकीय कार्यालयांमध्ये "१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम" राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रादेशिक विभागांमधून आपल्या विभागाची द्वितीय क्रमांकाने निवड झाली आहे. आपण केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आपले व आपल्या सर्व चमूचे मन:पूर्वक अभिनंदन !

विभागीय स्तरावरील १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम अंतर्गत राज्यस्तरावर केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल श्री. अतुल चव्हाण, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांना हे प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येत आहे.

29/5/2025

श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर
अपर मुख्य सचिव
सार्वजनिक बांधकाम विभाग

शिवेंद्रसिंहराजे भोसले
मंत्री
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून)

भारतीय गुणवत्ता परिषदेच्या (QCI) मूल्यांकनात विभागाच्या कार्यक्षमतेचे सखोल परीक्षण झाले. झिरो पेंडिंग, कार्यालयीन प्रक्रियेत वेग, डिजिटायझेशन, जनसंपर्कातील उत्तरदायित्व आणि पारदर्शक व्यवहार या सर्व घटकांमध्ये पुणे विभागाने उल्लेखनीय कामगिरी बजावली. हा यशाचा मान साऱ्या सहकाऱ्यांचा आहे. ज्यांनी आपले कर्तव्य अतिशय निष्ठा, शिस्त आणि गतिमान कार्यप्रणालीने पार पाडले. सर्वांच्या उत्कृष्ट कार्यामुळे निष्ठेमुळे हे होऊ शकले आहे, असे सार्वजनिक बांधकाम विभाग,पुण्याचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी सांगितले.

# विटखेडा येथे मध्यरात्री दारू पुरवठा करणाऱ्या विनोद जयस्वाल नामक इसमाला युवकांने पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

सातारा पोलीस ठाणे हद्दीतील विटखेडा गावात मध्यरात्री देशी व विदेशी दारू पुरवठा करणाऱ्या विनोद कचरूलाल जयस्वाल नावाच्या इसमास विटखेडा येथील तरुणांनी म ध्यरात्री(१२.३० वा.) देशी व विदेशी दारू सह मुद्देमाल रंगे हात पकडून त्यास पोलिसांच्या ताब्यात दिले. देवा भाऊ त्रिभुवन, रेखाबाई भालेराव, सांडू भाऊ जंगले यांनी सकाळी चार वाजेपर्यंत सातारा पोलीस ठाणे येथे उभा राहून गुन्हा दाखल करून घेतला यावेळी ईश्वर जगदाळे, राहुल कानडे, ऋत्विक साळवे , रितेश मुगल नीलू बनकर आदी बनकर कार्तिक खरात,ओम कर्डिले, गोपाल देवकर,विजय भालेराव, रवी दाभाडे, रोहित सोनवणे, अतिश खरात उपस्थित होते, तसेच गावातील बेकायदेशीर अवैद्य रित्या चालणारे दारूचे अड्डे तात्काळ बंद करावे असे मागणी ग्रामस्थांनी केली .

# जिल्हाधिकारी कार्यालयात जनसंवाद कक्ष

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या विविध अभ्यागतांच्या समस्यांचे व तक्रारी, गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जनसंवाद कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून त्यासाठी तीन कर्मचारीही नियुक्त करण्यात आले आहेत. या संदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आदेश निर्गमित केले असून दररोज (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी) दुपारी ३ ते ५ या वेळेत हा कक्ष कार्यान्वित असेल. नियुक्त कर्मचारी हे नागरिकांचे म्हणणे ऐकून त्यांच्या तक्रारींची सोडवणूक कशी होईल याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करतील. त्यांच्या तक्रारींची नोंद घेतील. संबंधित अधिकाऱ्यांशी मोबाईल द्वारे चर्चा घडवून आणतील. या कक्षात नायब तहसिलदार संभाजी थोटे, सहायक महसूल अधिकारी श्रीमती सोनाली देहाडे, महसूल सहायक दिनेश मेघमाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# 'स्टॉप डायरिया' मोहीम प्रभावीपणे राबवा- अपर जिल्हाधिकारी अडकूणे

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पावसाळ्यात होणारे संसर्गजन्य आजार लक्षात घेता बालकांच्या आरोग्यासाठी 'स्टॉप डायरिया' मोहीम प्रभावीपणे राबवावी,असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकूणे यांनी दिले.

'स्टॉप डायरीया' संदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. दयानंद पोवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी अभय धानोरकर यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात दि.१६ जून ते ३१ जुलै या कालावधीत 'स्टॉप डायरिया' मोहीम राबवली जाणार आहे. यामध्ये प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात याबाबतचे प्रशिक्षण, घरोघरी जाऊन स्वच्छतेचे महत्व ,हात धुण्याची योग्य पद्धत याविषयी म



ार्गदर्शन करण्यात येणार आहे. उपचारासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यासाठीचे निर्देश यावेळी देण्यात आले. डायरीया लागण झाल्यापासून त्यांना योग्य उपचार औषधे यासाठी शून्य ते पाच वय वर्ष मुलांचे सर्वे क्षण करून त्यांना झिंक आणि ओआरएस चे दोन पॅकेट त्याचप्रमाणे स्वच्छतेविषयी समुपदेशन अशा कार्यकर्तेद्वारे करण्यात येणार आहे. शाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये हात धुण्याचे प्रात्यक्षिक त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करण्याचे ही नियोजन करण्यात आल्याचे आरोग्य विभागाचे समन्वयक यांनी सांगितले. प्रतिकारशक्तीसाठी लसीकरण यामध्ये मिझर रूबेला याचे लसीकरण मोहीम प राबवून प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून बालकांचे प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. व प्रत्येक तालुका स्तरावरून पावसाळ्यातील आजाराविषयी वेळोवेळी निदान आणि उपचार करण्याबाबत आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचे यावेळी डॉ.अभय धानोरकर यांनी सांगितले.

# गणेश भाऊ गरंडवाल यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिर

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय जनता युवा मोर्चा छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा सरचिटणीस श्री. गणेश भाऊ गरंडवाल यांच्या वाढदिवसानिमित्त, दिनांक ७ जून २०२५ रोजी, लायन्स क्लब चिकलठाणा संचलित लायन्स नेत्र रुग्णालयाच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे उपक्रम सलग तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आले असून, गरजूंना आरोग्यसेवा पोहोचवण्याचा हा एक स्तुत्य उपक्रम आहे.

गणेश गरंडवाल यांनी गेल्या दोन वर्षांत २०० गरजू रुग्णांची मोफत म ोतीबिंदू शस्त्रक्रिया करून दिली आहे. यामध्ये रुग्णांच्या येण्या-जाण्याची, जेवणाची व निवासाची सर्व व्यवस्था पूर्णतः विनामूल्य करण्यात आली होती. यंदा देखील सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत आयोजित केलेल्या या शिबिरात शेकडो गरजू रुग्णांनी सहभाग घेतला. शिबिराचे उद्घाटन




उत्साहात पार पडले.

या वेळी खासदार डॉ. भागवत कराड, आमदार श्री. संजयजी केनेकर, माजी महापौर बापू घडामोडे, मंडळ अध्यक्ष श्री. सुनील जगताप, सौ. अनुराधा अतुल चव्हाण (आमदार, फुलंब्री विधानसभा मतदारसंघ) यांची उपस्थिती लाभली. या उपक्रमाच्या आयोजनाबद्दल गणेश भाऊ गरंडवाल यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

वाढदिवसाचा आनंद गरजूंना मदतीच्या रूपाने देण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरतो. 'समाजसेवेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या गणेश भाऊ गरंडवाल यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! उत्तम आरोग्य, यशस्वी वाटचाल आणि दीर्घायुष्य लाभो,' अशा शुभेच्छा खासदार डॉ. भागवत कराड यांनी दिल्या.

# वटपौर्णिमा-आयुष्य आणि आरोग्य लाभण्यासाठी

हिंदू धर्मात वटपौर्णिमा हा सण महिला मोठ्या उत्साहाने साजरा करतात. ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस वटपौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. आपल्या पतीला उत्तम आयुष्य आणि आरोग्य लाभण्यासाठी हे व्रत करण्यात येतं. यात वडाच्या वृक्षाची पूजा केली जाते.

या दिवशी स्त्रिया वटवृक्षाची पूजा करून मला व माझ्या पतिला आरोग्य संपन्न आयुष्य लाभू दे तसेच धनधान्य, मुले-बाळं, संसाराचा विस्तार होऊन भरभराटी येऊ दे, असे वटपौर्णिमेला गाऱ्हाणे घालतात. वड हा वृक्ष दीर्घायुषी असल्याने वृक्षांचे संवर्धन आणि जतन व्हावे या हेतूने वृक्षाची पूजा करण्याची कल्पना भारतीय संस्कृतीने स्वीकारली आहे. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत हे व्रत करायवयचे असते. तीन रात्र व्रत करावे असे सांगितले गेले आहेत. तरी तीन दिवस व्रत- उपवास करणे अशक्य असल्यास फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा.

या व्रताचा विधीत नदीकाठची वाळू आणून पात्रात भरुन तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाल्या जातात मग त्यांची षोडशोपचारे पूजा केली जाते. त्यानंतर पाच अर्धे घ्यावीत, मग सावित्रीची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनीसह सावित्रीची कथा ऐकावी.

**वटपौर्णिमेच्या पूजेसाठी काही लागणारे साहित्य-** हळद- कुंकू, सावित्री आणि सत्यवानाची मूर्ती, धूप, दीप, उदबत्ती, निरांजन, पाच प्रकारची फळं, फुले, दिवा ठेवण्यासाठी रोवळी, वडाला गुंडाळण्यासाठी पांढरा मोठा धागा, पाणी भरलेला लहान कलश, पंचामृत, हिरव्या बांगड्या, वटपौर्णिमेचा पूजा विधी सकाळची नित्यकर्म उरकल्यानंतर सुवासिंनीनी सौभाग्यलंकार परिधान करून देवाची प्रार्थना, तुळशी पूजन करून वडाच्या झाडाजवळ एकत्र व्हावं. वटसावित्री व्रताचा संकल्प करावा.

षोडशोपचार पद्धतीने वडाची पूजा करावी. बांबूच्या दोन टोपल्या घ्या, एका टोपल्यात सात प्रकारचे धान्य कापडाने झाकून ठेवा. माता सावित्रीची मूर्ती दुसऱ्या टोपलीत ठेवावी आणि धूप, दिवा, अक्षत, कुमकुम, माऊली इत्यादी पूजेचे साहित्यही ठेवावे. माता सावित्रीची पूजा केल्यानंतर वटवृक्षाला सात प्रदक्षिणा घालताना वटवृक्षाला माऊलीचा धागा बांधावा.

यानंतर ब्राह्मण किंवा गरजू व्यक्तीला श्रद्धेनुसार दान-दक्षिणा द्यावी. पूजेनंतर महिलां



एकमेकींना आंब्याचे वाण देतात. या दिवशी विवाहित महिलांनी वटवृक्षाची पूजा करून कथा ऐकावी. सावित्री आणि सत्यवानाच्या नावाचा जप करावा. सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया यमला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे', अशी प्रार्थना करतात.

**सावित्रि ब्रह्मसावित्रि सर्वदा प्रियभाषिणीं**
**तेन सत्येन मां पाहि दुःख-संसार-सागरा।**
**अवियोगो यथा देव सावित्र्या सहितस्य ते ।**
**अवियोगो तथास्माकं भूयातब**
**जन्मनि जन्मनि ।**
**वटमूले स्थितो ब्रह्मा वटमध्ये जनार्दन:।**
**वटाग्रे तु शिवो देव: सावित्री वटसंश्रिता ।।**

अशीही प्रार्थना केली जाते.

### वटपौर्णिमा विषयी पौराणिक कथा

अनेक वर्षापूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सावित्री नावाची कन्या होती. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहीत असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला. व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली. सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासूसासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात.

**- दिनेश परदेशी**

# पर्यावरण दिनाचा मुहूर्त साधून जिल्हाभरात वृक्ष लागवडीस प्रारंभ वृक्ष जगवा, माणूस जगेल- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शुद्ध हवा, शुद्ध पाणी जे जगण्यासाठी नितांत आवश्यक आहे. त्याकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत. पैसा, प्रॉपर्टी, मालमत्ता आपल्या मुलांसाठी मागे ठेवतांना त्यांच्यासाठी शुद्ध हवा, पाणी यांचीही तरतूद करुन ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी वृक्ष लावा, वृक्ष जगवा म्हणजेच माणूस जगेल, अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज वृक्ष लागवडीसाठी आवाहन केले.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आज जिल्ह्यात वृक्ष लागवड अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. जटवाडा, रहाळ पट्टीतांडा येथे वृक्ष लागवडीचा प्रारंभ करण्यात आला. त्यासोबतच जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत व शहर हद्दीतही वृक्ष लागवडीस सुरुवात करण्यात आली. जटवाडा रहाळ पट्टीतांडा येथे वन विभाग, १३६ इको बटालियन यांच्यावतीने ३१ हजार वृक्ष लागवड करण्यात आली. या उपक्रमात गायत्री परिवार, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, एनसीसी इ. सहभागी झाले होते.

सरपंच छाया चव्हाण, उपवनसंरक्षक सुवर्णा माने, कर्नल निर्देश साहा, लेफ्ट. कर्नल अमित प्रभू, मेजर अनिरुद्ध काळे, मेजर प्रमोद बहिरथ, सुभेदार मेजर चंद्रमा सिंग, सुभेदार विष्णू बढिया, नायब सुभेदार देवकर, तहसिलदार रमेश मुनलोड आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते वृक्ष लागवडीचा प्रारंभ करण्यात आला. वन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या क्षेत्रावर इको बटालियन तर्फे ३ लाख वृक्ष लागवड करण्यात येत असून त्याचा शुभारंभ आज करण्यात आला. पहिल्या दिवशी ३१ हजार वृक्ष लागवड करण्यात आली, अशी माहिती यावेळी देण्यात आली. येथे घनवन पद्धतीने वृक्ष लागवड करण्यात येत आहे. यासोबतच जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने १०० तर नगरपालिका, नगर पंचायत यांनी २०० वृक्ष लागवड करुन ते जगविण्याचे उद्दिष्ट जिल्हा प्रशासनाने दिले आहे. त्याचाही प्रारंभ आज करण्यात आला. त्यासाठी वृक्ष दिंडी काढून जनजागृतीही करण्यात आली.

# रत्नागिरी जिल्ह्याला माई रमाईचे नाव देऊन त्याग मुर्तीच्या सन्मान करावा - रामभाऊ वाहणे!




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्य शासनाने औरंगाबाद, उस्मानाबाद, अहमदनगर जिल्ह्याचे नामांतर केले आम्ही साखर वाटून तोंड गोड केले त्याच धर्तीवर आता त्याग मुर्तीं माई रमाई आंबेडकर यांचे नाव रत्नागिरी जिल्ह्याला देऊन त्याग मुर्तीच्या शासनाने सन्मान करावा असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे नेते रामभाऊ वाहणे यांनी केले ते आज माई रमाई यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यस्मरण करताना अध्यक्षस्थानावरून बोलत होते प्रमुख वक्ते म्हणून नाम देवराव निकोसे यांनी माई रमाई ची जिवन गाथा सांगितली तेव्हा श्रोत्यांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले होते आंरिमो चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी माई रमाई यांच्या छायाचित्रावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले मनोहर इंगोले यांनी दिपप्रज्वलन केले धर्माजी बागडे यांनी या प्रसंगी माई रमाई अमर रहे या घोषवाक्याने परिसर दणाणून सोडले.

रत्नागिरी जिल्ह्याला माई रमाई चे नाव देण्यात यावे या करिता लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शिष्टमंडळ भेटून निवेदन सादर करण्यात येईल असे नारायण बागडे यांनी सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष प्रा.रमेश दुपारे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरज ढोणे यांनी केले कार्यक्रमात पुण्यशील बोदले चरणदास गायकवाड, अभिषेक मिश्रा राहूल त्रिवेदी भागनबाई मेश्राम, महानंदा इलमकर, संगिता वासनिक, रोहीत पांडे,शालिक बांगर मामासाहेब मेश्राम राजु पांजरे उपस्थित होते.

# शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्थांनी तंबाखुमुक्तीसाठी समन्वयाने काम करावे-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचवावे. युवक, विद्यार्थी यांना तंबाखू सेवनापासून परावृत्त करुन जिल्हा तंबाखू मुक्त करावा. त्यासाठी सर्व शासकीय विभागांनी व स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आज तंबाखु मुक्तीसाठी कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकूने, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर तसेच तालुका आरोग्य अधिकारी व संबंधित समितीचे सदस्य, मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे आप्पासाहेब उगले यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, शाळा म हाविद्यालये, शासकीय कार्यालयामध्ये तंबाखूम ुक्त करण्यात यावे. प्रत्येक कार्यालयाने तंबाखूमुक्त कार्यालय करण्यासाठी मोहीम राबवावी. जिल्हा तंबाखूमुक्त करण्यासाठी लोकप्रतिनिधी, शासनाचे विविध विभाग आणि आरोग्य विभाग यांनी पुढाकार घेऊन समन्वयाने मोहीम राबवावी.

**कोटपा कायद्याचे स्वरुप**

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंध कायदा २००३ (कोटपा) अंतर्गत कलम चार प्रमाणे सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास बंदी, कलम ५ नुसार तंबाखूजन्य पदार्थाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जाहिरातीवर बंदी तसेच कलम सहा अ अंतर्गत १८ वर्षाखालील व्यक्तींना तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास बंदी आणि कलम सहा ब अंतर्गत शैक्षणिक संस्थेच्या शंभर मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्री बंदी आहे .त्याचप्रमाणे याचे उल्लंघन केल्यामुळे गुन्हा नोंद आणि २०० ते ५ हजार रुपये पर्यंतचा दंड आकारण्यात येतो अशी माहिती यावेळी देण्यात आली.

**कार्यालय प्रमुखांनाच अधिकार**

कलम चार नुसार कारवाई साठी दंड वसूल अंमलबजावणी करणारे अधिकृत अधिकारी म्हणून विक्रीकर, प्राप्तिकर, परिवहन विभागाचे उपनिरीक्षक, रेल्वे स्थानक प्रमुख, राज्य, केंद्र सरकारचे सर्व राजपत्रित अधिकारी, रुग्णालय प्रशासक, जिल्हा शल्य चिकित्सक, संचालक ,वैद्यकीय अधिकारी, रुग्णालय तसेच संस्थेचे प्रमुख मानव संसाधन अधिकारी, प्रशासन अधिकारी, शाळा महाविद्यालयाचे प्राध्यापक, ग्रंथालय अधिकारी, विमानतळ व्यवस्थापक, सार्वजनिक आरोग्य विभाग व आरोग्य सेवा संचालक ,अन्न औषध प्रशासन विभागातील उपनिरीक्षक व उच्च पदावर अधिकारी, निबंधक, उपनिबंधक, सरकारी वकील, शासनाचे सल्लागार, जिल्हा शिक्षण अधिकारी, व शाळा निरीक्षक, वाहतूक अधिकारी, तिकीट तपासणीस, वरिष्ठ तिकीट निरीक्षक, पोलीस प्रशासनाचे सहाय्यक उपनिरीक्षक, व त्या पदापेक्षा मोठे अधिकारी हे प्राधिकृत अधिकारी असतात.त्यांनी त्यांच्या संबंधित कार्यालयाच्या कामकाजाच्या क्षेत्रात असे कृत्य करणाऱ्याकडून दंड वसूल करून गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया करू शकतात.

**प्रचार व जनजागृती आवश्यक**

कोटपा कायद्या अंतर्गत कलम सहा अ, सहा ब प्रमाणे तंबाखू विक्री करणारे ठिकाण व शैक्षणिक संस्था येथे १८ वर्षाखालील मुलांना तंबाखू अथवा तंबाखूजन उत्पादन विकणे हा कायद्याने गुन्हा आहे. व तंबाखू मृत्यूकडे नेतो या प्रकारचे पोस्टर्स आणि शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात कुठलीही तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास कायद्याने बंदी आहे या कायद्याचे उल्लंघन करण्यास दोनशे रुपयापर्यंत दंड वसूल केला जाईल असे पोस्टर लावण्याचे ही निर्देश देण्यात आलेले आहेत. तंबाखूजन्य पदार्थाच्या पाकिटावर चित्रमय चेतावणी दिलेली असते ती त्यांना प्रदर्शित करणे आवश्यक कायद्याने बंधनकारक आहे धूम्रपान निषिद्ध क्षेत्र या प्रकारचा बोर्ड प्रत्येक आस्थापना, कार्यालय , शैक्षणिक संस्था यांच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. ही कार्यवाही केली जात आहे का याची तपासणी आरोग्य विभाग, पोलीस, अन्न औषध प्रशासन, यांच्या टीमने वेळोवेळी करावी तसेच शाळेमध्ये तंबाखू प्रतिबंधित क्षेत्र म्हणून पिवळ्या रंगाचे पट्टे लावणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृतीसाठी माध्यमिक शाळेत वादविवाद स्पर्धा व्याख्यानाची आयोजन ,कोटपा कायद्याचे तरतुदी, याविषयीचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे जेणेकरून तंबाखू सेवन आणि तंबाखू जन्य पदार्थाची विक्री साठवण वाहतूक यासाठी प्रतिबंध करण्यासाठी प्रतिबंधासाठी सहाय्य होईल असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.